## प्रकरण तिसरे

**संशोधन विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा मागोवा**

# प्रकरण तीन

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा मागोवा


३.१ प्रास्ताविक

३.२ संशोधन समस्येशी निगडित साहित्याचा मागोवा

३.२.१ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ स्वरूपातील व लेख स्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा

३.२.२ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचा मागोवा

३.३ समारोप.

## ३.१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणात (प्रकरण क्र. दोन - शिक्षणाचे व्यावसायीकरण, अर्थ, महत्व, तात्विक भूमिका) शिक्षणाचे व्यावसायीकरण, अर्थ, महत्व, तात्विक भूमिका, उद्दिष्टे व गरज याचे विवरण केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा अभ्यास केला आहे.

संशोधन समस्येशी निगडित साहित्याचा मागोवा घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पद्धती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते. यासंबंधी Prof. Whitney आपल्या 'The Elements of Research' या ग्रंथात म्हणतात,

> "The student should find, analyze and evaluate critically every pertinent research report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific.
>
> The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprete the significance of one's findings. In addition, it contributes to the scholarship of the investigator. No experienced researcher would think of undertaking a study without acquainting himself with the contribution of previous investigators."[1]

संशोधन साहित्याचा मागोवा घेण्याची उद्दिष्टे खालील प्रमाणे कथन केलेली आहेत.

१) निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.

२) निवडलेल्या विषयासंबंधी व आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

३) संशोधन विषयासंबंधी सिध्दांत व गृहीत कृत्य याच्या मांडणी-बद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.

४) आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविली समर्पक सांख्यिक तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

५) संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वतःची ज्ञानवत्ता वाढविणे.[२]

## ३.२ <u>संशोधन समस्येशी निगडित साहित्याचा मागोवा</u> :

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे -

१) ग्रंथ स्वरूपात प्रकाशित झालेले सैध्दान्तिक व माहितीवजा स्वरूपाचे साहित्य.

२) संशोधन पदवीसाठी विद्यापीठातून सादर केले गेलेले शोधप्रबंधाच्या स्वरूपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम ग्रंथ स्वरूपात व लेख स्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे.

### ३.२.१ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ व लेख स्वरूपातील प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा :

श्री. कुशी जी.एस. यांनी संपादित केलेला "Vocationalisation of Education"[3] या ग्रंथामध्ये निरनिराळ्या लेखकांनी शिक्षणाच्या व्यावसायीकरणाबाबत मत मांडले आहे. त्यामध्ये शिक्षणाच्या व्यावसायीकरणाबाबतची माहिती डॉ.(सौ.) माधुरी शहा यांनी सांगितली आहे. सर्वसाधारण शिक्षणाशी व्यावसायिक शिक्षणाचा संबंध, सहाव्या पंचवार्षिक योजनामध्ये केलेली तरतूद शिक्षणाच्या व्यावसायीकरणाबाबतची तात्विक भूमिका याबाबत ऊहापोह केलेला आहे.

प्रोफेसर राम जोशी यांच्या "Need for Vocational Courses at University level" या लेखामध्ये विद्यापीठीय स्तरावर व्यावसायिक कोर्सेसची गरज व्यक्त केली आहे.

डॉ. एम.आर. मिढे यांच्या "Integration of all higher education for better and effective vocational training" या लेखामध्ये समाजाशी असणारी आंतरक्रिया, नवीन कल्पना निर्मिती, व्यावसायिक प्रशिक्षणाच्या समस्या, उच्च शिक्षणाची नवीन ध्येय याबाबत ऊहापोह केलेला आहे.

डॉ.(मिस) मेहरू डी. बेंगाली यांच्या "When education leads to productivity (a case for vocationalisation of education)" या लेखामध्ये शैक्षणिक आकृतीबंध, माध्यमिक स्तरावर शिक्षणाचे व्यावसायीकरणाची आवश्यकता, सूचना, कार्यक्रम याबाबत ऊहापोह केला आहे.

डॉ. प्रभाकर रझादा यांच्या "Vocational Education" या लेखामध्ये व्यावसायिक शिक्षणाचे कामामध्ये असणारे महत्व, व्यावसायिक शिक्षणाची गरज, ऐतिहासिक विकास, व्यावसायिक शिक्षणाची संकल्पना,

व्यावसायिक शिक्षणाची व्याप्ती, व्यावसायिक शिक्षण व सर्वसाधारण शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाची उद्दिष्टये, याबाबत ऊहापोह केलेला आहे.

प्रो. एल.जी. चिटणीस यांच्या "Vocational education in Gujarat State" या लेखामध्ये गुजरातमधील व्यावसायिक शिक्षणासंबंधी चर्चा केलेली आहे. व्यावसायिक शिक्षण व सर्वसाधारण शिक्षण व्यावसायिक शिक्षकांचे मुदती अभ्यासक्रमाचे स्वरूप ( Terminal Nature ) अधिक दोन स्तरावर शिक्षणाच्या व्यावसायीकरणाची कार्यवाही, निष्कर्ष याबाबत ऊहापोह केलेला आहे.

डॉ. सुनिल मोहंती यांच्या "Vocationalisation of Education" या लेखामध्ये गरज, कोठारी कमिशनची भूमिका ओरीसा राज्यातील व्यावसायिक शिक्षणाबाबतची सद्यःस्थिती, निष्कर्ष याबाबत चर्चा केलेली आहे.

अ. वि. गाडगीळ यांच्या " शालेय शिक्षणाला व्यवसाय शिक्षणाची जोड " या लेखामध्ये शालेय शिक्षणाला व्यवसाय शिक्षणाची का आवश्यकता आहे हे प्रतिपादन केलेले आहे. त्या लेखामध्ये गाडगीळ म्हणतात, " भारतीय शिक्षणात व्यवसाय शिक्षणाचा अवलंब आपण किती व कसा करणार हा यक्ष प्रश्न असून सोडवावयाचा आहे. व उद्योगधंद्यावर सरकार सक्ती करू शकत नसल्याने व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव नवीन अभ्यासक्रमात केला गेला तरी तो कागदी घोडे नाचविण्याचाच प्रयत्न होणार व विद्यार्थ्यांचा मोठा ओघ उच्च शिक्षणाच्या मागे लागलेलाच दिसणार. क्रांतीकारी पाऊले उचलल्याशिवाय शिक्षणात आमुलाग्र परिवर्तन होण्याची शक्यता नाही हेच खरे."[४]

प्रा. श्री. मा. पत्की यांच्या " शिक्षणाचे आव्हान : एक चिंतन " या लेखामध्ये शैक्षणिक व व्यवसाय मार्गदर्शनाचे महत्व विषद केलेले आहे. मार्गदर्शनाखेरीज शिक्षण दिशाहिन बनते. त्यासाठी शासनाने पुढाकार

घेतला पाहिजे. जनसंपर्क माध्यमाचा प्रभावीपणे उपयोग करावा आणि दुसरीकडे किमान कनिष्ठ माध्यमिक स्तरापासून उच्च स्तरीय शिक्षण संस्थापर्यन्त विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षण संस्थावर सोपवावी आणि शासनाने मार्गदर्शनाच्या सर्व सोयी उपलब्ध करून द्याव्यात.[५]

व.अ. काळपांडे यांच्या " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ महाराष्ट्राची वाटचाल " या लेखामध्ये अधिक २ स्तरांवर शिक्षणाचे व्यावसायीकरण याबाबत ऊहापोह केलेला आहे. उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणाचे व्यवसायीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने आर्थिक साहाय्य देण्याची योजना आखली आहे. आर्थिक साहाय्यामधून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाचे प्रबलन, राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची स्थापना, निवड केलेल्या संस्थामध्ये शिक्षक व अन्य कर्मचा-याची नियुक्ती, अभ्यासक्रमासाठी आवश्यक अशा साहित्याची खरेदी या बाबींचा अंतर्भाव आहे.[६]

आनंद पुंडलिक ढिवराळे यांच्या " व्यावसायिक शिक्षणातून विकास " या लेखामध्ये व्यावसायिक लघुउद्योगातून मुलांचा विकास होईल यादृष्टीने उपक्रम निवडला आहे. उपक्रमाची वेळ, कालावधी, स्थळ, उद्दिष्टे याबाबत माहिती दिलेली आहे. उपक्रमामध्ये दंतमंजन तयार करणे, फुलाचे हार तयार करणे, अगरबत्ती तयार करणे, महाभृंगराज तेल तयार करणे याचा समावेश केला आहे.[७]

गु.स. परदेशी यांच्या " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व माध्यमिक शिक्षण " या लेखामध्ये व्यवसाय शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. कारण माध्यमिक शिक्षण पूर्तीनंतर विद्यार्थी किमान जीवनोपयोगी उत्पादक कार्य करू शकला पाहिजे. यासाठी ग्रामीण भागातील शाळांमधून शेतीचे शिक्षण तर शहरी भागातील शाळांमधन उद्योगाचे शिक्षण दिले जावे अशी अपेक्षा आहे.[८]

के.एम. गेडाम यांच्या " महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण " या लेखामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षणात विविधता असणे आवश्यक आहे. लवचिकपणा असणे आवश्यक आहे. शालेय शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व वाढविण्याचे अनेक प्रयत्न अनेकदा केले गेले परंतु त्यात म्हणावे तसे यश आले नाही. व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व वाढवावयाचे असेल तर त्याची सुरुवात शालेय शिक्षणापासूनच करणे उचित ठरेल असे प्रतिपादन केले. महाराष्ट्र राज्यामध्ये व्यवसाय शिक्षणाची सुरुवात फार मोठ्या प्रमाणावर करून १९९५ पर्यन्त इच्छित ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने फार मोठ्या प्रमाणावर तयारी सुरु आहे. [९]

मेंहदळे, वाघ, डिंगणे यांच्या "व्यावसायिक जगाची तोंडओळख " या पुस्तकामध्ये व्यवसायाचा विकास, लघुव्यवसायातील व्यवस्थापन व्यवसायाचा शोध, वैयक्तिक क्षमता व व्यवसाय यांचा समन्वय या बाबींचा ऊहापोह केलेला आहे. [१०]

३.२.२ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या <u>संशोधित साहित्याचा मागोवा :</u>

वरील परिच्छेदांतून ग्रंथरूपाने तसेच लेख रूपाने प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा घेतला. पुढील परिच्छेदांतून संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या संशोधित साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे.

प्रस्तुत विषयाशी संबंधित संशोधनाच्या अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधकाने पुढील ग्रंथाचे अवलोकन केले.

१) दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च, एन.सी.ई. आर.टी., न्यू दिल्ली, १९६९.

२) दि सर्वे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादक डॉ. एम.बी. बुच, सेंटर ऑफ अॅडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि एम्.एस्. युनिव्हर्सिटी, बरोडा, १९८४.

३) एज्युकेशनल इनव्हेस्टीगेशन इन युनिव्हर्सिटीज (१९३९-१९६१), एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली, १९६३.

४) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र (१९३९-१९७०) स्टेट इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, पुणे-३०, १९७२.

५) दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७२-१९७८) संपादक डॉ. एम.बी, बुच सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, बरोडा, १९७९.

६) एज्युकेशनल रिसर्च इन दि युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, संपादिका डॉ.(सौ.) प्रतिमा देव, डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन, युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, १९८१.

७) एज्युकेशनल रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र, प्लॅटिनम ज्युबिली इयर व्हाल्युम, संपादक डॉ. एन.के. पाटोळे, एस.टी. कॉलेज, बॉम्बे (मुंबई), १९८३.

८) अॅबस्ट्रॅक्टस् ऑफ डॉक्टरल रिसर्चेस इन एज्युकेशन संपादक डॉ. एम.बी. पांडे, डॉ. एम.बी. कुंडले, नागपूर, सेक्रेटरी, शिक्षण समीक्षा, मंडळ, १९८७.

९) थर्ड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७८-१९८३) संपादक डॉ. एम.बी. बुच, नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग, १९८६.

वरील ग्रंथाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यावतीने प्रसिध्द होणारे ` रिसर्च बुलेटिन ` या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या ` युनिव्हर्सिटी न्यूज ` या साप्ताहिकातील ` थिसिस ऑफ द मंथ ` या सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या प्रबंधाची नावे चाळली.

वरील ग्रंथांचे काळजीपूर्वक अवलोकन करून प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असे संशोधन अद्यापी झाले नसल्याचे आढळून येते. म्हणून या विषयाचे संशोधन नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल. परंतु शिक्षणाच्या व्यावसायीकरणाच्या संदर्भात झालेल्या व प्रस्तुत संशोधन विषयाशी थोड्याफार प्रमाणात संबंधित असणाऱ्या काही संशोधनाचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. संबंधित संशोधन अहवालाची उद्दिष्टे, कार्यपध्दती, निष्कर्ष, शिफारशी थोडक्यात पुढे दिलेल्या आहेत.

1) <u>SAMAL S.</u> - "Construction of a vocational interest inventory to study the interest pattern of high school services and its relationship with their intelligence, socio-economic structure and academic success."

हा संशोधन प्रकल्प संबलपूर विद्यापीठामध्ये १९७१ साली सामल एस. यांनी पीएच.डी. पदवीसाठी सादर केला.

<u>या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे</u> -

१. हायस्कूल-माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या लिंगाप्रमाणे व जागाप्रमाणे व्यावसायिक आवड व बुध्दी यांचा संबंध शोधणे.
२. सामाजिक व आर्थिक संबंध शोधून काढणे.

<u>संशोधन पध्दती</u> -

वरील संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला होता. ५७० मुले, ५८० मुली इ. १० वीच्या वर्गातील नमुना म्हणून निवडण्यात आल्या होत्या.

निष्कर्ष -

१. लिंगभेदानुसार प्रशासकीय, व्यावसायिक, सामाजिक सेवा आणि कला याबाबत महत्वाचा फरक दिसून येतो.

२. जागेप्रमाणे ( Placewise ) आवडीवर परिणाम होत नाही.

३. सामाजिक सेवा, शेती व विज्ञान, लिपीकांची कार्ये याचा सहसंबंध सामाजिक-आर्थिक प्रतिष्ठेशी नकारात्मक स्वरूपाचा दिसून येतो.

2) MATUR C.P. - "An analytical study of children's free - expression drawings with a view to predict their vocational interests."

हा संशोधन प्रकल्प पंजाब विद्यापीठामध्ये १९७५ साली माथूर सी.पी. यांनी पीएच.डी. पदवीसाठी सादर केला.

या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे :

१. मुलांच्या व्यावसायिक आवडीमध्ये मुक्त चिंतनाद्वारे माहीत व्यक्त करणे.

२. १३ ते १४ वयोगटाच्या मुलांसाठी व्यावसायिक आवडीसंबंधी मुक्त चिंतनावर आधारीत नमुना (नॉर्म) तयार करणे.

३. प्रदीपित साधनांचा व्यावसायिक आवडीसाठी विकास करणे.

संशोधन पद्धती -

वरील संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला होता. जयपूर, जोधपूर, उदयपूर, अजमेर, कोटा, बिकानेर या राजस्थानमधील शहरामध्ये राबविला.

निष्कर्ष :

विद्यार्थ्यांची व्यावसायिक आवड, वैद्यकीयशास्त्र, तांत्रिकशास्त्र व अभियांत्रिकीकडे जास्त कल असलेला आढळून आला.

9636

3) DEWASTHALEE, R.B. - "An Investigation in to the present secondary education curricula (Std. V to X) in the Maharashtra State with a view to revision in the context of vocationalization of education at all levels."

हा प्रबंध मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील पीएच.डी.या पदवीसाठी डॉ. देवस्थळी आर.बी. यानी १९७८ साली पूर्ण केला.

या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे -

१) सद्य माध्यमिक शिक्षणक्रमाच्या साहाय्याने व्यावसायीकरणाचे स्वरूप व वाढ संपादण्याच्या कार्याचा शोध घेणे.

२) व्यावसायीकरण संपादण्यासाठी निरनिराळ्या क्षेत्राची निर्मिती करणे.

३) माध्यमिक स्तरावर निरनिराळ्या व्यावसायिक कोर्सेस व क्षेत्रे यासाठी अभ्यासक्रम रचना तयार करणे.

संशोधन पध्दती -

वरील संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक पध्दतींचा वापर करण्यात आला होता. सामग्री गोळा करण्यासाठी मुलाखती, निरीक्षण, भेटी यांचा वापर केला होता.

निष्कर्ष व शिफारशी -

१) विद्यालयीन वातावरण व्यावसायीकरणासाठी उपयुक्त आहे.
२) इ. ५ वी पासून व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात झाली पाहिजे.
३) काही व्यावसायिक कोर्सेसची माहिती गळतीवाल्यांच्यासाठी (dropouts) द्यावी.

४) व्यावसायिक कोर्स हा ` जादा ` समजू नये.

५) यशस्वी व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्तिनंतर विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात यावे.

६) व्यावसायिक अभ्यासक्रमातून प्रात्यक्षिक दृष्टिकोनावर भर देण्यात यावा.

७) व्यावसायिक मार्गदर्शनासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम आवश्यक आहे.

८) सर्वसाधारण व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांनी निरनिराळ्या शेजारच्या शाळांना भेटी द्याव्यात.

4) PATEL, C.K. - A critical study of the Higher Secondary School organisation in Gujarat State with special reference to Vocational Education

हा संशोधन प्रकल्प गुजरात विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील पीएच.डी. या पदवीसाठी पटेल, सी.के. यानी १९८० साली पूर्ण केला.

संशोधकाने गुजरात राज्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विद्यालयाचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

संशोधन पध्दती -

सदरचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. प्रश्नावली व भेटीद्वारे सामग्री गोळा केली आहे. प्रश्नावलीमध्ये शिक्षकाची अर्हता, कार्यक्रमातील सहभाग तसेच इमारत, शाळा, कार्यशाळा, इतर सुविधा, ग्रंथालय या संदर्भात प्रश्न विचारले होते.

निष्कर्ष -

१. उच्च माध्यमिक स्तरावरील वर्ग चालविण्यामध्ये व्यवस्थित मार्गदर्शन मिळत नाही. प्रमुखाकडून वारंवार बदलते धोरण राबविल्यामुळे गोंधळ निर्माण होतो.

२. शाळांमधून शिक्षकांना उद्बोधक स्वरूपाचे ( Orientation ) प्रशिक्षण दिले जात नाही.

३. महाविद्यालयीन जादा शिक्षक विद्यार्थ्यांना गंभीरपणे अध्यापन करीत नाही.

४. विद्यार्थी ध्येय न बाळगता वाणिज्य शाखेकडे वळतात. कला व विज्ञान शाखेकडे दुर्मिळता आढळून येते.

५. शाळांना सरकारकडून मिळणारे अनुदान कमी मिळते. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जास्तीतजास्त सुविधा पुरविता येत नाहीत.

5) PILLAI J.K. and THANGASAMY S. - "Vocationalisation at the Higher Secondary stage of the 10+2+3 pattern of Education."

हा संशोधन प्रकल्प मदुराई कामराज विद्यापीठामध्ये पिलाई जे.पी. आणि थानगास्वामी एस. यांनी एन.सी.ई.आर.टी. च्या आर्थिक साहाय्याने १९८१ साली पूर्ण केला.

संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टये :

१) मदुराई जिल्ह्याचा व्यावसायीकरणाचा सर्व्हे करणे.
२) रोजगार व स्वयंरोजगार ताबडतोब मिळवण्यासाठी कोणकोणते व्यावसायिक शिक्षणक्रम निवडावेत याची ओळख करून घेणे.
३) विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी अग्रक्रम देण्याच्यादृष्टीने अभ्यासक्रम निवडणे.
४) अधिक दोन स्तरावरील शिक्षणाच्या व्यावसायीकरणाकृ विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचे मत अजमावणे.

संशोधन पध्दती -

संशोधन प्रकल्पासाठी सर्वेक्षणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला होता. प्रश्नावलीद्वारे सामग्री गोळा करण्यात आली होती. प्रश्नावली विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्याकडून भरून घेतली होती.

संशोधन प्रकल्पाचे निष्कर्ष :

१) मदुराई जिल्हासाठी, प्लास्टीक, आगपेटी कारखाना, रंगसाधने, मोटार सायकल रिपेअरी, साबण निर्मिती इ. सारखे व्यवसाय उपयुक्त ठरतील.

२) पाच व्यावसायिक अभ्यासक्रमातून हा अभ्यासक्रम विकसित करता येईल.

३) १५ टक्के विद्यार्थ्यांजवळ स्वत:चे वर्कशॉप बाळगण्याची इच्छा होती.

४) २५ टक्के विद्यार्थी खाजगी कंपन्यामधून रोजगार मिळवण्याची इच्छा बाळगून होते.

५) ४० टक्के विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ततेनंतर कला, विज्ञान या शाखांकडे त्याचा कल दिसून आला.

६) ६५ टक्के विद्यार्थी प्रगत स्वरूपाचे शिक्षण घेण्यासाठी उत्सुक होते.

७) आर्थिक पाठबळ नसल्यामुळे ६० टक्के विद्यार्थी जवळ वर्कशॉप बाळगता आली नाही.

८) २० टक्के विद्यार्थी, शिक्षक स्वत:च्या जबाबदारीवर व्यवसाय सुरू करतील किंवा खाजगी कंपन्यामधून रोजगार मिळवू शकतील.

९) ५५ टक्के शिक्षक आणि पालकांना असे वाटते की अधिक २ हा स्तर अधिक ३ स्तरापेक्षा बरा आहे.

6) THIMMAIAH G. SEETHARAMU A.S., AZIZ A. and ROYAPPA P.H. - "Vocational Education : Problem and prospects - a case study of Karnataka State, ISEC, Bangalore, 1981."

हा संशोधन प्रकल्प थमैयुया, सीतारामु, अजीज रायप्पा यानी इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स ॲन्ड स्कॉनॉमिक चेंज, बॅंगलोर मध्ये कर्नाटक सरकारच्या आर्थिक साहाय्याने १९८१ साली पूर्ण केला.

संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टये :

१) कर्नाटक राज्यातील व्यावसायिक कोर्सेसमधून व्यावसायिक कौशल्यांना असणाऱ्या मागणीचे मूल्यमापन करणे.
२) विद्यार्थ्यांची हजेरी, निवड, उपलब्ध असणाऱ्या सुविधा याबाबत व्यावसायिक शिक्षणाच्यादृष्टीने समालोचन करणे.
३) व्यावसायिक शिक्षणात भेडसावणाऱ्या समस्याचा अभ्यास करणे.
४) भविष्यकालीन व्यावसायीकरणासाठी कार्यक्रम ठरवून शिफारशी करणे.

संशोधन पध्दती :

सदरचा संशोधन प्रकल्प Ex post facto पध्दतीने राबविला आहे. सामग्री गोळा करण्यासाठी +२ स्तरावरील ४५ महाविद्यालयांचा समावेश करून घेतला होता. सामग्री प्रश्नावली साहाय्याने गोळा केलेली होती. पोस्टाद्वारे प्रश्नावली प्राचार्यांना पाठविल्या होत्या. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या.

संशोधन प्रकल्पाचे निष्कर्ष -

१. व्यावसायिक अभ्यासक्रम कमी कौशल्य असणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरण्यासाठी प्रयत्नशील नव्हते.

२. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने वाढली होती.

३. मुलींची संख्यासुध्दा तुलनेने वाढली होती.

४. व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा अधिक होता.

५. विद्यार्थी गळतीचे प्रमाण हे सर्वसाधारण कोर्सेससारखे होते.

६. महाविद्यालयामध्ये राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी साहित्य-सुविधा चांगली होती.

७. महाविद्यालय बऱ्याच अंशी अंशकालीन शिक्षकांवर अवलंबून असल्याचे दिसून आले.

८. बऱ्याच शिक्षकांच्या मते सर्वसाधारण कोर्सेसपेक्षा या कोर्सेसचे विद्यार्थी अभ्यासक्रम गंभीरपणे घेतात.

९. बऱ्याच महाविद्यालयातील प्राचार्यांमध्ये मिळणारे अनुदान पुरेसे नाही.

7) Impact of Vocational Courses in Commerce (A Critical Study based on the working of the scheme in selected courses of Kolhapur district.)

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठामध्ये १९८३ साली लोखंडे एन.आर. यांनी एम्.फिल्. पदवीसाठी सादर केला.

<u>या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे</u> :

१) उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षणाच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास करणे.

२) उच्च माध्यमिक स्तरावर अभ्यासक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे शिक्षण खाते कशाप्रकारे प्रशासकीय यंत्रणा राबविते त्याचा अभ्यास करणे.

३) उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षणक्रमाच्या अनुषंगाने शिक्षक, विद्यार्थी, विभागप्रमुख यांच्या मुलाखती घेणे.

४) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सामाजिक-आर्थिक समस्याचा अभ्यासक करणे.

५) उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा सर्व्हे करणे.

६) जिल्हा व्यावसायिक कार्यालयाच्या भूमिकांचा अभ्यास करणे.

<u>संशोधन पध्दती</u> :

सदरच्या संशोधकाने सर्व्हेक्षण पध्दतीचा अवलंब केला होता. सामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखतीचा वापर केला होता. प्रश्नावली ही विद्यार्थी, शिक्षक, विभागप्रमुख यांना देण्यात आली होती.

<u>निष्कर्ष व शिफारसी</u> -

संशोधकाने अभ्यासक्रम, विद्यार्थी निवड, शिक्षक, प्रात्यक्षिक कार्य, शैक्षणिक सुविधा, प्रशासकीय यंत्रणा, जिल्हा व्यवसाय अधिकाऱ्यांची भूमिका यांच्यावर निष्कर्ष काढून शिफारसी केल्या आहेत.

8) BHATT K.C. - "A Critical study of the vocational education in West Germany vis-a-vis the vocational education in India, Ph.D. Edu. MSU, 1972.

जर्मनीमधील व्यावसायिक शाळांमधून दिले जाणारे ज्ञान व अनुभव यांचा विचार करून भारतातील व्यावसायिक शिक्षणासाठी मदत करणे हा हेतू होता.

फ्रँकफूट मधील २८० विद्यार्थ्यांना प्रश्नावली वाटून माहिती गोळा केली. त्याचप्रमाणे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांच्या प्राचार्यांच्या मुलाखती घेतल्या. अध्यापकांबरोबर चर्चा व औद्योगिक क्षेत्रातील चालक व प्रतिनिधी यांचेशी भेटी घेऊन माहिती गोळा केली. आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रातील वाचनालयातील अप्रकाशित साहित्य, निरनिराळे आयोग व समिती यांचे अहवाल याचा वापर भारतीय व्यावसायिक शिक्षणाच्या संबंधातूच करण्यात आलेला आहे.

निष्कर्ष व शिफारसी -

१. व्यावसायिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, स्वरूप, प्रशासन, प्रतिष्ठा विशेष तरतुदी यामधून दिसल्या.

२. जर्मनीमध्ये लोकांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोनाबाबतची प्रतिष्ठा कामगारामध्ये दिसून येते.

३. जर्मनीमधील व्यावसायिक शिक्षणाला सार्वजनिक उद्योग व शासन पाठिंबा देत असते.

४. व्यापारी परीक्षा मंडळावर तज्ञ व्यक्ती स्वयंरित्या सहभागी होतात.

५. व्यावसायिक शिक्षणाची आखणी ही स्थानिक गरजेप्रमाणे केली जाते.

६. व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलांबरोबरच मुलींचा सहभाग असतो.

७. व्यावसायिक शिक्षणक्रमाच्या निवडीसाठी मार्गदर्शन कक्ष मदत करीत असतात.

८. जर्मनीमध्ये व्यावसायिक शिक्षणक्रम पूर्ततेनंतर योग्य उद्योगामध्ये स्थलांतर करण्याची सोय आहे.

९. व्यापार व व्यवसायासाठी व्यावसायिक शिक्षक, प्रशिक्षण संस्था आणि योग्य साहित्य उपलब्ध असते.

१०. व्यावसायिक शिक्षण व सर्वसाधारण शिक्षण यांच्यामध्ये ताळमेळ राखला जातो.

३.३ <u>समारोप</u> :

संशोधनाशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा घेतल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होते की, अद्यापि प्रस्तुत संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबंधित असे संशोधन झाले नसल्याचे आढळून येते. सबब या विषयाचे संशोधन नाविण्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

संशोधन समस्येशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित आणि संशोधित साहित्याचा मागोवा घेतल्यानंतर पुढील प्रकरणात (प्रकरण क्रमांक चार - संशोधनाची कार्यपध्दती) संशोधनासाठी वापरलेली पध्दती, सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने, याबाबत ऊहापोह केला आहे.

## संदर्भ

१) F.L. Whitney, '<u>Elements of Research</u>', (New York : Prentice Hall Inc., 1954), pp. 98-112.

२) मुळे रा.श., उमाठे वि.तु., ` <u>शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे</u>, प्र.आ.१९७७ (नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ), पृ. ७१.

३) Koshe G.S., '<u>Vocationalisation of Education</u>', First Edition 1989, (Pune : Vidyarthi Griha Prakashan, Pune-411030) pp. 6, 14, 28, 43.

४) गाडगीळ अ.वि., ` शालेय शिक्षणाला व्यवसाय शिक्षणाची जोड ` शिक्षण आणि समाज, जुलै-सप्टेंबर १९८६, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, पुणे-२९, पृ. २९७

५) पत्की श्री.मा., ` शिक्षणाचे आव्हान - एक चिंतन ` शिक्षण समीक्षा, डिसेंबर १९८६ जानेवारी १९८६, नागपूर, १९८६, पृ. १२९.

६) काळपांडे व.अ., ` राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ महाराष्ट्राची वाटचाल, शिक्षण संक्रमण, जानेवारी १९८९, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-१०, पृ. ५-६.

७) हिवराळे आनंद पुंडलिक, ` व्यावसायिक शिक्षणातून विकास ` जीवन शिक्षण, एप्रिल, १९८८, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, पृ. १४-१५.

८) परदेशी, गु.स., ` राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व माध्यमिक शिक्षण ` शिक्षण संक्रमण, एप्रिल-मे, १९८७, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, पृ. २४.

९) गेडाम के.एम., ` महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण, ` शिक्षण संक्रमण, डिसेंबर १९८७, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, पृ. ७४-७५.

१०) मेहेंदळे, वाघ, डिंगणे, ` व्यावसायिक जगाची तोंडओळख, ` नवनीत प्रकाशन, मुंबई-२८, पृ. ५, ३९, ४१, ४४.